पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४२**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १९/१/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ९६३**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे डिसेंबर २०२० चा मासिक अहवाल निर्दशनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/५६८ दि.८/१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र. ९६४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/१२/२०२० ते दि.३१/१२/२०२० चा मासिक अहवाल निर्दर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. उआप–४/४१७३ दि.११/१/२०२१ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ९६५**

**मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.**

प्रभाग क्र.४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक बजेट कोड CE22A548 /SJ10-2520 महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | १ कोटी | --- |
| | नविन सुचविलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब धायरी बेनकरवस्ती परिसरातील संभाजीनगर येथील अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील उंब–या गणपती चौक ते भैरवनाथ मंदिर परिसरात रस्ता दुरूस्त व फर्निचर विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ३ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |
| ४ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ६ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण येथे सुरू असलेल्या शिवसृष्टीचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |
| ७ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावामध्ये विविध ठिकाणी ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ८ | प्रभाग क्र.४२ ब डी एस के रोड चे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | प्रभाग क्र.४२ ब समाविष्ट धायरी गावातील चावडी कटयाचे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |
| १० | प्रभाग क्र.४२ ब पवळी चौक परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. ९६६**
मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील गायकवाड पेट्रोलपंपा समोरुन आशियाना पार्क - २, स.नं. २७७ बाणेर येथे जाणारा रस्ता ६ मिटरचा असून तो महापालिकेच्या कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.

**विषय क्र. ९६७**
मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील आनंदबन क्लब औंध पासून ते ग्रीन पार्क सोसायटी बाणेर येथील भाग्यश्री बिल्डींग व स.नं. २७६ बाणेर पर्यंत असणारा रस्ता ६ मिटरचा असून तो कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ९६८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/१२/२०२० ते दि.३१/१२/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/५८४ दि.११/१/२०२१ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ९६९**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ वानवडी सन २०१८-१९ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१८३७ दि. १३/१/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १८ सन २०२०-२०२१ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ९७०**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरीता डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची सेवा उपलब्ध करून घेतलेल्या सेवकांचे किमान वेतन दराने मागील वेतन अदा करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मावतं/६०७ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. मे.विद्या ऑनलाईन पुणे प्रा.लि. व मे. जेट सर्व्हिसेस यांना कंत्राटी कामगार(नियमन व निर्मुलन) अधिनियमन १९७० अन्वये दि.२ एप्रिल २०१९ ते ३० जून २०१९ अखेर प्रती डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रती दिन दर र.रु. ५२६=०१ प्रमाणे, दि.१ जुलै २०१९ ते २३ जुलै २०१९ अखेर प्रती डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रती दिन दर र.रु.५३९=८५ व दि.२४ जुलै २०१९ ते २२ सप्टेंबर २०१९ पर्यंतचे प्रती डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रती दिन दर र.रु.६३१=१७ असे किमान वेतन कायदा १९७० अन्वये दरमहाचे वेतन अदा करणेस,
२. वरील प्रमाणे होणारा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील **RE11N103** सन २०२० - २१ या अर्थशीर्षक वर खर्ची टाकून वेतन अदा करणेस,

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ९७१**

सन २०२०-२१ या सालाकरीता राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यासाठी लसूनघास पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार गुरुराज एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,९३,७००/- पेक्षा ३% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. २७,७४,५११/- उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उकाजा/६१४ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ९७२**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड–१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड– सीई२२अे७०५/एसजे२१–३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | –– |
| नविन सुचविलेले काम | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड – आरई१७एफ१४७व्ही | –– | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. १५/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७३**

मा.अजय खेडेकर व मा.धनराज घोगरे यांचे दि. १७/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, पान क्र. २९१, यादी क्र.एसयु१, अ.क्र. २२५, बजेट कोड – सीई२६अे३३६/एसयु१–२२४, प्रभाग क्र. १२ क मधील थोरात उद्यान येथील म्युझिकल फाउंटनचे काम करणे | २५ लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक, भवन विभागाकडील शाळा, दवाखाने, मार्केट, मनपा इमारती, कोठ्या, समाजमंदिरे, घाट, स्मशानभूमी, विसर्जन हौद इ.बाबत देखभाल दुरुस्तीची कामे करणे, पान क्र. १५३, (यादी क्र. एसआर १४), पान क्र. ११८, बजेट कोड– आरई२२अे११३/एसआर१४–१६८, प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणे | ––– | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. १५/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७४**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. १५/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७५**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. १५/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७६**

प्रभाग क्र. ३८ अ मधील बिबवेवाडी स.नं. ६५९ पार्ट येथील प्रसुतिगृह व प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे अर्धवट काम पुर्ण करुन कोव्हीड–१९ चे उपचाराकरिता तात्पुरत्या स्वरुपात ऑक्सीजन हॉस्पीटलची व्यवस्था करणेसाठी र.रु.३६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३०२ दि.२४/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, CE20A1249/A6-211, पुणे शहरातील HCMTR रस्ते विकसीत करणे | ३६५ लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>अधिक्षक अभियंता (भवन) कार्यालय, प्रभाग क्र. ३८ अ मध्ये राजीव गांधी नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे, CE17A242/SJ6-375 | ---- | ३६५ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/१२/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७७**

मा.किरण दगडेपाटील यांचे दि. १/१/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१०अ, बावधान येथील स्वामी विवेकानंद जलतरण तलाव व बॅडमिटन हॉलचे उर्वरित कामे करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये विविध ठिकाणी स्मशानभूमी/दफनभूमी विकसित करणे/दशक्रिया विधीसाठी घाट बांधणे व विविध विकासकामे करणे ( यादी क्र.एसजे १२) पान क्र.२५,अ.क्र.३०, प्रभाग क्र.१०अ, मधील बावधान येथील स्मशानभूमी व दफनभूमीचे उर्वरित कामे करणे.<br>( एकूण तरतूद १ कोटी ) | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम –<br>प्रभाग क्र.१०अ, बावधान येथील स्वामी विवेकानंद जलतरण तलाव व बॅडमिटन हॉलचे उर्वरित कामे करणे | --- | ५० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ९७८**

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २९/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३२ वारजे माळवाडी मधील खान वस्ती समोरील दफनभुमीमध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड – सीई२०बी१०२/एसटी२–१२०७, प्रभाग क्र.३२ क मध्ये नादब्रम्ह सोसायटी मुख्य रस्त्यालगत कॉर्नर सुशोभिकरण करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३२ वारजे माळवाडी मधील खान वस्ती समोरील दफनभुमीमध्ये विविध विकास कामे करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ९७९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोवीड-19 विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी ईलर्निंग स्कुल अनुसया शाळा व अण्णाभाउ साठे स्मारक या ठिकाणी विविध कामे करणे कामाबाबतचे देयक अदा करणेची कार्यवाहीबाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५५० दि. १/१/२०२१ चे पत्र.

१.प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F557,COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२.मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक २५/०४/२०२० ते २६/१०/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये १६,९६,५७८.०२(रक्कम रुपये सोळा लाख श्यानव हजार पाचशे अठयाहत्तर आणि पैसे दोन फक्त) चे बिल अदा करणेस,

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ९८०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोवीड-19 विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी आंबेडकर वस्तीगृह येरवडा परिसर या ठिकाणी विविध कामे करणे कामाबाबतचे देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५५५ दि. ५/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक १६/०४/२०२० ते १७/०८/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये २७,९२,२४८.१३(रक्कम रुपये सत्तावीस लाख ब्यानव हजार दोनशे अठठेचाळीस आणि तेरा पैसे फक्त) चे बिल अदा करणेस,

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ९८१

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी (लोहगाव, शिवणे, मुंढवा, हडपसर, साडेसतरा नळी, आंबेगाव खु., उंड्री व येवलेवाडी, धायरी, आंबेगाव बु., उरुळी देवाची, फुरसुंगी) व प्रस्तावित २३ गावांसाठी पाणीपुरवठा योजनेतील डिझाईन, देखरेख संपूर्ण प्रकल्प व्यवस्थापन करणे या कामासाठी तज्ञ सल्लागार यांचेकडून निविदा मागविणेबाबत ("Request For Proposal (RFP) for Design, Supervision and Project Management Consultancy for implementation of Water supply system in newly merged 11 villages (Lohagaon, Shivane, Mundhawa, Hadapsar, Sade, Satra Nali, Ambegaon (Kd), Undri, Yewalewadi, Dhayari, Ambegaon (Bk), Uruli Devachi, Fursungi) and proposed 23 villages in Pune Municipal Corporation) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७२(ब) व ८९ अन्वये मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/५५६ दि. ५/१/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ९८२

शिक्षण विभाग (प्राथ), पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांतील सर्व माध्यमाच्या इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ई लर्निंग प्रणाली प्रशिक्षण देणेबाबत बीएसएनएल, पुणे यांनी सादर केलेल्या (Final Sign Off Bill) फायनल साईन ऑफ बिलाकरिता शाळा डिजिटल स्कूल ई लर्निंग करणे (RE12A139) या अर्थशिर्षामध्ये कमी पडणारी रक्कम रुपये ३,१७,५७,६०८/- खालील अर्थशिर्षकातील रक्कमेतून वर्गीकरणाने उपलब्ध करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/शिवि(प्राथ)/५५७ दि. ५/१/२०२१ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, प्राथमिक शिक्षण विभाग,<br>१) सहली RE12A125<br>२) विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण RE12A134<br>३) फर्निचर व इतर साहित्य शाळांसाठी व कार्यालयासाठी व दुरुस्ती RE12A123E | <br>१,४५,८०,०००/-<br>१,०८,००,०००/-<br><br>६३,७७,६०८/- | <br>----<br>----<br><br>---- |
| सुचवलेले काम<br>प्राथमिक शिक्षण विभाग, शाळा Digital School (e learning) ई लर्निंग करणे RE12A139 | ---- | ३,१७,५७,६०८/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/१/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. ९८३**

पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता सेवा देणारे सल्लागार संस्थेचे पॅनल नेमणेकरिता एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/४९३ दि.२०/११/२०२० च्या मान्यतेनुसार मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या सात संस्थांपैकी चार संस्थांनी (Edelweiss Gallagher, Global, Alliance. India Insure Risk Management ) त्यांच्या संस्थेच्या कामकाजाबाबत संगणकीय सादरीकरण केले आहे. या चारही संस्थांचे कामकाज पाहता त्या सर्वाना empanel करणे शक्य आहे. या कामाकरिता या संस्थांना कोणताही आर्थिक मोबदला पुणे महानगरपालिकेमार्फत दिला जाणार नाही .

तरी पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता स्वारस्य अभिरूची प्रस्ताव (EOI) मार्फत इच्छुक असलेल्या ४ संस्थांना empanel करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५७२ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र. ९८४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३ )(क )मधील तरतुदीनुसार नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स.नं.०४ रक्षकनगर खराडी येथील जलतरण कॉम्पलेक्स, आपले घर शाळा क्र.१५०, आनंदऋषी शाळा, एस आर ए स्कीम विमाननगर(सी.सी.सी.)येथे तयार करणेत आलेल्या विलगीकरण कक्षातील स्थापत्य विषयक कामे करणे व इतर साहित्य पुरविणे हे काम तातडीचे व अत्यावश्यक असल्याने मे.हरिप्रिया कन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करुन घेतले असल्याने खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५७५ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे हरिप्रिया कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक २५/०३/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये१७,३५,६७१=११ (रक्कम रुपये सतरा लाख पंसतीस हजार सहाशे एकाहत्तर आणि पैसे अकरा फक्त)बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९८५**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत लोकनेते ना.शरदचंद्र पवार बहुद्देशीय भवन येथे स्थापित करण्यात आलेल्या स्वॅब सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील विद्युत विषयक कामे (सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने किमान १२% कमी) खरेदी करुन पुरविणे या कामाकरिता मे. शेवाळे इलेक्ट्रीकल ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)अन्वये करणेत आलेली असून खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.३/५७६ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१) सदर कामी कामी शेवाळे इलेक्ट्रीकल यांनी दि.२३/०९/२०२० ते दि.०९/११/२०२० केलेल्या कामाचे र.रु.१२,३८,५२२=७० बिल अदा करणेस व त्यांच्या बरोबर करार करणेस,

२) विद्युत विषयक कामांचा खर्च खालील अर्थशिर्षकावरुन अदा करणेस,

अर्थशिर्षक –सन–२०२०–२१ चे अंदाजपत्रक
कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे.
महसूली कामांसाठी– RE17F257
कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामांसाठी खर्च.

**विषय क्र. ९८६**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत लोकनेते ना.शरदचंद्र पवार बहुद्देशीय भवन येथे स्थापित करण्यात आलेल्या स्वॅब सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील जनरेटर व त्यासंबंधीत विद्युत विषयक कामे (सन २०१९–२० च्या शेड्युल मान्य दराने किमान ७% कमी) खरेदी करुन पुरविणे या कामाकरिता मे. सार्थक इलेक्ट्रोमेक प्रा.लि. ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)अन्वये करुन घेण्यात आलेली असून खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.३/ ५७८ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१) सदर कामी मे.सार्थक इलेक्ट्रोमेक प्रा.लि. यांनी दि.२२/०९/२०२० ते दि.११/११/२०२० केलेल्या कामाचे र.रु.१३,८४,४७९=१० बिल अदा करणेस व त्यांच्या बरोबर करार करणेस,

२) विद्युत विषयक कामांचा खर्च खालील अर्थशिर्षकारुन अदा करणेस
अर्थशिर्षक –सन–२०२०–२१ चे अंदाजपत्रक
कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे.
महसूली कामांसाठी– RE17F257
कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामांसाठी खर्च.

**विषय क्र. ९८७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क ) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोवीड-19 विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी संत ज्ञानेश्वर वस्तीग्रह, नागपुर चाळ व येरवडा कन्टेमेंट झोनमधील शौचालयाबाबत प्रतिबंधत्मक उपाययोजना करणेकरिता इतर कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आलेली असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५७९ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक १६/०४/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये २०,७२,६७५=१४ (रक्कम रुपये वीस लाख बाहत्तर हजार सहाशे पंच्याहत्तर आणि पैसे चौदा फक्त) चे बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९८८**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क )मधील तरतुदीनुसार नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वाघोली भारतीय जैन संघटना हॉस्टेल येथे तयार करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षातील विविध कामे तातडीची व अत्यावश्यक काम श्री साई समर्थ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आलेली असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५८० दि. ११/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. श्री साई समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक ०७/०५/२०२० ते ३०/०६/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये ३५०५३२.३२ बिल अदा करणेस सदर बाब मा.स्थायी समिती पुणे महानगरपालिका यांचेमार्फत मा.मुख्य सभा यांचे निर्देशनास आणणेस

विषय क्र. ९८९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क ) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोवीड-19 विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी आंबेडकर वस्तीग्रह व परिसर या ठिकाणी प्रतिबंधत्मक उपाययोजना करणे कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आलेली असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत्त मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५९४ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक १६/०४/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये १२,८२,१६९=७८ (रक्कम रुपये बारा लाख ब्याऐंशी हजार एकशे एकोणसत्तर आणि पैसे अठयाहत्तर फक्त) चे बिल अदा करणेस,

विषय क्र. ९९०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 ( 3 ) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्‌भवलेल्या परिस्थितीवेळी आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या क्वारंटाईन कक्षाकरीता तातडीने खरेदी करण्यात आलेल्या आवश्यक साहित्याची मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तकत्यानुसार मे.महावीर सेल्स - र.रु 60,77,000/-, मे.श्रीराम एन्टरप्रायझेस - र.रु - 4,34,689=84 व मे.हिबीसकस मार्केटिंग - र.रु. 7,50,000/- असे एकूण रक्कम रुपये 72,61,689=84 ची बिले अदा करणेस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असून सदरची बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/५९६ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ९९१

पुणे महानगरपालिका झोन क्र.२ – कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत एम.आय.टी.जेन्टस येथे ॲल्युमिनियम पार्टीशन करणे. हे काम ठेकेदार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांचेकडून या एजन्सीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम करुन घेणेस व करार करणेस तसेच याकामी दि.३१/०७/२०२० पर्यत र.रु. ३,७४,१६७/– व सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल ठेकेदारास अदा करणेत आलेली असून खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प.क्र.२/५९७ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये सदरचे कामी ठेकेदार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांची नेमूणक करणेस व त्यानुसार त्यांचेबरोबर करार करणेस,
२. दि.२०/०६/२०२० पासून ते सदरचे काम संपेपर्यंत ठेकेदार मे. शुभम कन्स्ट्रक्शन यांचे याकामी सदरचे काम संपेपर्यंत होणारी रक्कम अधिक जी.एस.टी. व अधिक कर याप्रमाणे होणाऱ्या कामाचे बिल वेळोवेळी ठेकेदारास अदा करणेस,

विषय क्र. ९९२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क ) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोवीड-19 विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी संत ज्ञानेश्वर वस्तीगृह , व परिसरात याठिकाणी विविध कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आलेली असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत्त मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/५९८ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक १६/०४/२०२० ते १७/०८/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये२७,१२,०९२=६८ (रक्कम रुपये सत्तावीस लाख बारा हजार ब्यानव आणि अडोसष्ट पैसे फक्त) चे बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९९३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क ) मधील तरतुदीनुसार येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने कोवीड-19 झोपडपटटया, मंडई, मनपा शाळा, वस्ती पातळीवर समाज प्रबोधन व चाचणी करणेसाठी व्यवस्था करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आलेले असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील नमूद बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/६०० दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे त्रिभुवन कन्स्ट्रक्शन यांचे दिनांक ०५/०७/२०२० ते २०/११/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये २२,४६,९३२=७५ (रक्कम रुपये बावीस लाख सेहचाळीस नउशे बत्तीस आणि पैसे पंच्याहत्तर फक्त) चे बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९९४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क )मधील तरतुदीनुसार नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत कोवीड –१९ विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी खराडी हॉस्टेल विमाननगर लोणकर शाळा,आनंदऋषी शाळा ,आपले घर शाळा या ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे.शिवम इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन यांचेकडून करुन घेण्यात आलेले असून देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/६०१ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे शिवम इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन यांचे दि. १४/४/२०२० ते दि.१८/८/२०२० पर्यंतचे र.रुपये ६,७४,९७५=८४ बिल अदा करणेस,

**विषय क्र. ९९५**

परिमंडळ क्र.३ सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कोरोना प्रतिबंधात्मक योजनेकरिता विलगीकरण कक्ष (कै.वस्ताद हरिभाऊ पोकळे प्राथमिक शाळा, धायरी, पुणे, कै.सिताराम नारायण गावडे प्राथमिक शाळा, जनता वसाहत, पर्वती, पुणे)व कोव्हिड केअर सेंटर(सिंहगड कॉलेज मुलांचे वसतीगृत – रायगड, पन्हाळा, मुलीचे वसतीगृह ए–पायास्वामी, बी–यमुना, सी–गोदावरी) येथे दर्शनीभागात पत्रा मांडव करणे व इमारतींच्या आतील मोकळ्या जागेत पत्रा पार्टीशन, कपडा पार्टीशन, गाद्या पुरविणे अशा स्वरुपाची कामे पुणे म.न.पा.कडील ठेकेदार मे.जगन्नाथ मंडप डेकोरेटोर (प्रो.प्रा. श्रीमती पुजा मच्छिद्र लांडगे) यांचेकडुन सन २०१९–२० चे शेड्युल मान्य दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाचीमा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील अ.क्र.१ ते ६ प्रमाणे झालेल्या कामाच्या एकुण र.रु.३९,०६,३७१=२८ खर्चाची माहिती मा.स्थायी समिती पुणे महानगरपालिका यांचेमार्फत मा.मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचेकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/६०२ दि.१२/१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.९९६**

परिमंडळ क्र.३ सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील स्व.मुरलीधर पांडुरंग लायगुडे रूग्णालय या कोविड केअर सेंटर मध्ये ऑक्सिजन व व्हेंटीलेटर बेडसाठी लागणारी स्थापत्य विषयक फर्निचर , प्लबींग, इलेक्ट्रीकल व फॅब्रीकेशन करणे अशा स्वरुपाची कामे पुणे म.न.पा.कडील मे. विश्वरत्न कन्स्ट्रक्शन(प्रो.प्रा. श्री.ओंकार अजय गुजर) यांचेकडुन व कॉंक्रीटीकरण करणे , पत्र्याचे शेड व फेन्सिंग करणे अशा स्वरुपाची कामे पुणे म.न.पा.कडील ठेकेदार मे.एस पी कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा. श्री.संतोष लांडगे) यांचेकडून सन २०१९-२० चे शेड्युल मान्य दराने करुन घेणेस, मा.महापालिका आयुक्त यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाची मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील अ.क्र.१ ते २ प्रमाणे झालेल्या कामांच्या एकूण र.रू.१९,३५,४५४=४६ खर्चाची माहिती मा.स्थायी समिती यांचेमार्फत, मा.मुख्य सभा, पुणे मनपा यांचेकडे माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.३/६०५ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.९९७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ( ३ )(क )मधील तरतुदीनुसार नगररोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत कोवीड -१९ विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी राजीवनगर साउथ विमाननगर येथे कोरोना बाधीत रुग्ण ठेवलेल्या ठिकाणी व स्वॅब सेंटर येथे विद्युत विषयक कामे करणे तातडीचे व अत्यावश्यक काम हे मे. गणराज इलेक्ट्रीकल्स यांचेकडून करुन घेण्यात आलेली असून कामाबाबतचे देयक अदा करणेची कार्यवाही बाबत खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/६०६ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

१. प्रस्तुत खर्च महसुली कामांसाठी बजेट कोड क्र.RE17F257,COVID-19 अंर्तगत अत्यावश्यक महसुल कामासाठी (खर्च) अर्थशिर्षकामधुन रक्कम अदा करणेस,

२. मे गणराज इलेक्ट्रीकल्स यांचे दिनांक २०/०७/२०२० ते १६/११/२०२० पर्यंतचे रक्कम रुपये १२,५३,६७३=१२ (रक्कम रुपये बारा लाख त्रेपन्न हजार सहाशे त्र्याहत्तर आणि पैसे बारा फक्त) बिल अदा करणेस

**विषय क्र. ९९८**

सन २०२१-२०२२ सालाकरिता खास देणगीची तरतुद करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/६१३ दि. १२/१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.९९९**

पुणे मनपाच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील अर्थशिर्षकामधून अ) RE17F153C मनपा सभासदांसाठी रिएम्बर्समेंट करीता र.रु. १,००,००,०००/- आणि ब) RE17F153E माजी सभासदांसाठी करीता र.रु. ८०,००,०००/- एकूण र.रु. १,८०,००,०००/- मा.सभासद व माजी सभासद यांचे वैद्यकिय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपुर्तीसाठी खालील तक्त्यास नमुद केल्याप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६१६ दि.१४/१/२०२१ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, ७.रुग्णालये औषधालये, प्रस्तुतीगृहे इ. | | |
| १) RE17F147R - पुणे शहरातील मृत्यु पावणाऱ्या व्यक्तिंचे अत्यंसंस्कार मोफत करणे | ३६,००,०००/- | ---- |
| २) RE17F122 - नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक कामे करणे (भवन) | ४५,००,०००/- | ---- |
| ३) RE17F227 - सर्व दवाखाने व रुणालय प्रस्तुतीगृहासाठी CC TV Camere बसविणेकरीता | ४५,००,०००/- | ---- |

| | | |
|---|---|---|
| ४) RE17F229 – नवजात अर्भकाची बेरा टेस्ट करणेकामी<br>५) RE17F250 – अटल विमा योजना<br>६) RE17F255 – दारिद्र रेषेखालील नागरीकांना विमा योजना लागू करणे | ९,००,०००/-<br>२०,००,०००/-<br>२५,००,०००/- | ----<br>----<br>---- |
| सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, सन २०२०-२१<br>१) ७ रुग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये क. सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना RE17F153 C<br>२) ब१. मनपा. सभासदांसाठी रिएम्बर्समेंट, RE17F153E, माजी सभासदासांठी वैदयकीय सहा.योजना | ----<br>---- | १,००,००,०००/-<br>८०,००,०००/- |

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.